# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-३०/२०२५ दिनांक- २३/०१/२०२५

## प्रेस नोट

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात मा. पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, मि.भा.व.वि व मा. सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक, मि.भा.व.वि. यांच्या मार्गदर्शनाखाली **३५ वे रस्ता सुरक्षा अभियान** २०२५ अंतर्गत दिनांक २२/०१/२०२५ रोजी काशिमीरा वाहतूक विभागाचे प्रभारी अधिकारी श्री सागर इंगोले यांनी गोल्डन नेस्ट सर्कल पोलीस चौकी येथे रिक्षा/टॅक्सी/टेम्पो चालक/मालकांसाठी मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर मोफत आरोग्य शिबीर हे लायन्स क्लब व व्होकार्ड हॉस्पीटल, मिरारोड तसेच सारथी फाउंडेशन येथील वैद्यकीय अधिकारी तसेच स्टॉप यांच्या मार्फतीने रिक्षा, टेम्पो, टॅक्सी चालक यांच्या करिता आरोग्य शिबीर घेण्यात आले. सदर शिबीरा मध्ये डोळे तपासणी, रक्तदाब, हदयाचे ठोके, ऑक्सिजन लेवल, बॉडी फॅट, बॉडी मास, ईसीजी इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. वाहन चालक यांना नियमीत आरोग्य तपासणी करुन घेणे बाबत मा. सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक, मि.भा.व.वि. श्री. शंकर इंदलकर यांनी मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. सदरचे शिबीरा मध्ये **एकूण १४० रिक्षा/टॅक्सी/टेम्पो चालक/मालक** यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.





------0000------